राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत महत्वाकांक्षी जिल्ह्यांमधील (Aspirational Districts) ग्रामपंचायतींच्या कार्यालयीन इमारतींच्या बांधकामाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः राग्रास्व /२०१८/ प्र.क्र. १२५/ आस्था-१५

बांधकाम भवन, २५,मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
तारीख: २१ सप्टेंबर, २०१९

वाचा :-

१) केंद्र शासनाच्या पंचायती राज मंत्रालयाचे पत्र क्र. D.O.No.M-11015/95/2018-CB,दि.१८ जुलै,२०१८.
२) शासन निर्णय क्रमांकः राग्रास्वअ- २०१८ /प्र.क्र.१२१/आस्था-१५, दि. २० फेब्रुवारी, २०१९.
३) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः राग्रास्व- २०१८ /प्र.क्र. १०२ (भाग-२)/आस्था-१५, दि.८ मार्च, २०१९.
४) शासन निर्णय क्रमांकः ग्रापंइ-२०१७/प्र.क्र.२४६/बांधकाम-४, दिनांक २३ जानेवारी, २०१८

प्रस्तावना :

केंद्र शासनाने पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी केंद्र शासनाच्या **"राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान"** या योजनेचे पुनर्गठन करुन “ **राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान”** ही योजना सन २०१८-१९ पासून लागू केली आहे . सदर योजना केंद्र शासन पुरस्कृत असून या योजनेच्या निधीचे प्रमाण हे केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% असे आहे. त्या अनुषंगाने सदरची केंद्र पुरस्कृत “**राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान** (RGSA)” ही योजना महाराष्ट्र राज्यात वित्तीय वर्ष २०१८-१९ पासून राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दि. २० फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये व दि.८ मार्च, २०१९ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये घेण्यात आला .

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांची क्षमताबांधणी, तज्ञ मनुष्यबळ उपलब्धता, पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी **"राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान"** ही योजना राज्यात सर्वत्र राबविण्यात येणार आहे. त्याचबरोबर निती आयोगाने निवडलेल्या देशातील ११५ महत्वाकांक्षी जिल्ह्यांमधील (Aspirational Districts) महाराष्ट्र राज्यातील नंदूरबार, उस्मानाबाद, वाशिम व गडचिरोली हे चार जिल्हे आणि मिशन अंत्योदय अंतर्गत ५२४५ समूहातील (Clusters) लोकप्रतिनिधींची क्षमताबांधणी, लक्षवेध पंचायतींना (Panchayat Learning Centers) विशेष सहाय्य, पेसा क्षेत्रासाठी विशिष्ट संरचना, प्रचार व प्रसिध्दी, नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन, आर्थिक विकास इत्यादी बाबींवर विशेषत्वाने भर

देण्यात येईल व उत्पन्न वृध्दीच्या लघु उद्योगासाठी आवश्यक निधीच्या कमतरतेची पूर्तता करण्यात येईल.

केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायतीच्या कार्यालयीन इमारत बांधकामाकरिता प्रति ग्रामपंचायत जास्तीत जास्त रुपये २० लक्ष निधी याप्रमाणे सन २०१९-२० च्या वार्षिक कृती आराखड्यामध्ये २१५ ग्रामपंचायतींच्या नवीन कार्यालयीन इमारतीच्या बांधकामासाठी निधी मंजूर केलेला आहे . त्याअनुषंगाने नंदूरबार, उस्मानाबाद, वाशिम व गडचिरोली या चार महत्वाकांक्षी (Aspirational) जिल्ह्यांतील ज्या २१५ ग्रामपंचायतींना स्वत:ची कार्यालयीन इमारत नाही, अशा ग्रामपंचायतींना कार्यालयीन इमारत बांधकामाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रभावीपणे करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत **"राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान** (RGSA)" योजनेसाठी मा. प्रधान सचिव (ग्राम विकास) यांच्या अध्यक्षतेखाली **"राज्य कार्यकारी समीती"** गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या दिनांक ८ एप्रिल, २०१९ व दिनांक २२ जुलै, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत नंदूरबार, उस्मानाबाद, वाशिम व गडचिरोली या चार महत्वाकांक्षी (Aspirational) जिल्ह्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वत:ची कार्यालयीन इमारत नाही,अशा ग्रामपंचायतींना, "**राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान** (RGSA)" या योजनेअंतर्गत ग्रामपंचायत कार्यालयीन इमारत बांधकामाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. "**राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान** (RGSA)" या योजनेंतर्गत नंदूरबार, उस्मानाबाद, वाशिम व गडचिरोली या चार महत्वाकांक्षी (Aspirational) जिल्ह्यातील नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधकामासाठी जिल्हानिहाय मंजूर करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींची संख्या खालीलप्रमाणे आहे .

अ.क्र.	महत्वाकांक्षी (Aspirational) जिल्हयाचे नाव	नवीन कार्यालयीन इमारत बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेलया ग्रामपंचायतींची संख्या
१	नंदूरबार	४७
२	वाशिम	८५
३	उस्मानाबाद	४९
४	गडचिरोली	३४
एकूण		**२१५**

३. जिल्हानिहाय नवीन कार्यालयीन इमारत बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींच्या नावांची यादी या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र - “अ", “ब", “क" व "ड" मध्ये जोडण्यात आली आहे.

४. केंद्र शासनाच्या निकषानुसार ग्रामपंचायत कार्यालयीन इमारत बांधकामासाठी प्रति ग्रामपंचायत रु. २०,००,०००/- (रुपये वीस लक्ष फक्त) अथवा कार्यालयीन इमारतीच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकाची रक्कम या पैकी जी रक्कम कमी असेल तितकी रक्कम अधिक सौरऊर्जा संयंत्रासाठी रु. २,००,०००/- (रुपये दोन लक्ष फक्त) याप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

५. ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधकामासाठी ग्राम विकास विभागाच्या क्रमांक ग्रापंइ - २०१७/प्र.क्र.२४६/बांधकाम-४, दिनांक २३ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयानुसार मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत ठरविण्यात आलेल्या रु. १८ लाख किंमतीच्या इमारतीच्या आराखडयानुसार बांधकाम करावयाचे असून उर्वरित रु. २ लाख रक्कमेतून महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) यांच्या निकषाप्रमाणे १ ते १० किलोवॅट क्षमतेच्या सौरऊर्जा संयंत्रासाठी प्रति किलो वॅट रु. ४७,०००/- इतकी आधारभूत किंमत विचारात घेता कमीत कमी चार किलोवॅट क्षमतेचे सौरऊर्जा संयंत्र प्रत्येक ग्रामपंचायतीने उभारुन सौरऊर्जा निर्मिती करावयाची आहे.

६. सौरऊर्जा निर्मितीनंतर ग्रामपंचायत कार्यालयासाठी व शक्य आणि जवळ असल्यास ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील अंगणवाडी व जिल्हा परिषद शाळांच्या इमारतीसाठी सौरउर्जेचा वापर करावा. त्यानंतरही सौरउर्जा अतिरिक्त असल्यास महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून मोबदला घेवून सदर कंपनीस अतिरिक्त सौरऊर्जा पुरवावी. याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील.

७. जिल्हा परिषदनिहाय मंजूर केलेल्या ग्रामपंचायतींच्या संख्येप्रमाणे संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन इमारतीच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता द्यावी व राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे यांच्याकडून निधी उपलब्ध करुन घेवून संबंधित ग्रामपंचायतीला वितरित करावा.

८. सदर शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र- “अ", “ब", “क" व "ड" मधील स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नसलेल्या ग्रामपंचायतीनी या योजनेतून त्यांच्या का र्यालयीन इमारतीचे बांधकाम करावयाचे असल्यास प्रथम ग्रामसभेचा ठराव पारित करून त्याच्या प्रतीसह निधीच्या मागणी साठी प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करावा. संबधीत ग्रामपंचायतीच्या मालकीची कार्यालयीन इमारत नसल्याची खात्री करून व शासनाच्या इतर कोणत्याही योजनेतून सदर प्रयोजनार्थ निधी उपलब्ध करून दिलेला नाही अथवा भविष्यात मागणी करण्यात येणार नाही असे प्रमाणपत्र संबधित ग्रामपंचायतीकडून प्राप्त केल्यानंतरच जिल्हा परिषदेने अंतिम मजूरी प्रदान करावी.

९. ग्रामपंचायतीनी त्यांच्या कार्यालयाचे बांधकाम शासन निर्णय क्र. ग्रापई-२०१३/प्र.क्र. १८९/ पंरा-७, दि. ३०.०१.२०१४ अन्वये तयार केलेल्या प्रचलित आराखड्यानुसार करणे आवश्यक राहील. ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर विहितमुदतीत कार्यालयीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असल्याची खात्री जिल्हा परिषदेने करुन त्याबाबतचा अहवाल राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे यांना सादर करावा.

१०. या कामाकरीता होणारा खर्च मागणी क्र मागणी क्र.एल-२, २०५३ जिल्हा प्रशासन, ०९३ जिल्हा आस्थापना राज्य क्षेत्र,(०६) पंच, सरपंच, सचिव, अशासकीय सदस्यांना प्रशिक्षण, (०६)(०६) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, (केंद्र हिस्सा ६०%),लेखाशिर्ष क्र. २०५३A११७, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर). व मागणी क्र.एल-२, २०५३ जिल्हा प्रशासन, ०९३ जिल्हा आस्थापना राज्य क्षेत्र,(०६) पंच, सरपंच, सचिव, अशासकीय सदस्यांना प्रशिक्षण, (०६)(०७) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, (राज्य हिस्सा ४०%),लेखाशिर्ष क्र. २०५३A१२६, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० साठी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. या योजनेंतर्गत खर्चाच्या विनियोजनाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास व उप सचिव (आस्था-१५), ग्राम विकास विभाग यांना एकत्रीत पाठविण्याची जबाबदारी राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे यांची राहिल.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१९२२०००८९१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shashank Yashwant Barve
Date: 2019.09.21 11:42:01 +05'30'

(शशांक य. बर्वे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,

३. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,

४. मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,

५. मा. विरोधी पक्ष नेता महाराष्ट्र विधान परिषद/ विधानसभा, विधानभवन, मुंबई.

६. मा.विधान सभा/ मा.विधान परिषद सदस्य (सर्व),

७. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव.

८. मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)

९. मा.अ.मु.स. (वित्त) यांचे स्वीय सहायक

१०.मा.अप्पर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक

११.मा.प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक

१२.मा.प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान) यांचे स्वीय सहायक

१३. विभागीय आयुक्त (सर्व)

१४.महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), बाणेर रोड, पुणे

१५.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (नंदूरबार, उस्मानाबाद, वाशिम व गडचिरोली),---- प्रत्येकी २ प्रती.

१६.राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे. --- २ प्रती

१७.सह सचिव /उप सचिव (सर्व),(ग्राम विकास विभाग,) बांधकाम भवन, मुंबई.

१८. उपसचिव (बांधकाम-४) ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.

१९.निवडनस्ती-आस्था-१५

प्रपत्र-"अ"		
राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत नंदुरबार जिल्हयातील नवीन कार्यालयीन इमारत बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेलया ग्रामपंचायतींची यादी		
अ.क्र.	तालुका	ग्रामपंचायतींचे नांव
१	अक्कलकुवा	खडकुना
२	अक्कलकुवा	टावली
३	अक्कलकुवा	मंडारा
४	अक्कलकुवा	कुवा
५	अक्कलकुवा	कंकाळामाळ
६	अक्कलकुवा	खाई
७	अक्कलकुवा	बेडाकुंड
८	अक्कलकुवा	वाडीबार
९	अक्कलकुवा	सल्लीबार
१०	अक्कलकुवा	कंकाळा
११	धडगांव	पाडामुंड
१२	धडगांव	मनखेडी बु.
१३	अक्कलकुवा	आमली
१४	अक्कलकुवा	कोयलीविहीर
१५	तळोदा	चौगाव खु
१६	तळोदा	बेलीपाडा
१७	तळोदा	बंधारा
१८	तळोदा	रापापुर
१९	नवापुर	लक्कडकोट
२०	नवापुर	बिलमांजरे
२१	नवापुर	तलावीपाडा

२२	नवापुर	वऱ्हाडीपाडा
२३	अक्कलकुवा	कुकडीपादर
२४	अक्कलकुवा	बिजरीगव्हाण
२५	अक्कलकुवा	साकलीउमर
२६	अक्कलकुवा	नाला
२७	धडगांव	गेंदा
२८	धडगांव	आचपा
२९	धडगांव	बिजरी
३०	नंदुरबार	आसाणे
३१	नंदुरबार	उमर्दे खु.
३२	अक्कलकुवा	घंटाणी
३३	अक्कलकुवा	सिंगपुर
३४	तळोदा	करडे
३५	तळोदा	अमलपाडा
३६	तळोदा	भवर
३७	तळोदा	दसवड
३८	तळोदा	काझीपुर
३९	तळोदा	तुळाजे
४०	शहादा	खरगोन
४१	शहादा	रामपुर
४२	शहादा	इस्लामपुर
४३	शहादा	लांबोळा
४४	शहादा	औरंगपुर
४५	शहादा	आकसपुर
४६	शहादा	कुढावद
४७	शहादा	कलमाडी त.बो.

प्रपत्र-"ब"		
राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत वाशिम जिल्हयातील नवीन कार्यालयीन इमारत बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेलया ग्रामपंचायतींची यादी		
अ.क्र.	तालुका	ग्रामपंचायतींचे नांव
१	वाशिम	देवठाणा
२	वाशिम	आडगाव
३	वाशिम	वांगी
४	वाशिम	धानोरा खु.
५	वाशिम	इलखी
६	वाशिम	एकांबा
७	वाशिम	खंडाला खु.
८	वाशिम	कोंडाळा महाली
९	वाशिम	राजगांव
१०	वाशिम	चावडी
११	वाशिम	सोंडा
१२	वाशिम	उमरा कापसे
१३	वाशिम	जुमडा
१४	वाशिम	कृष्णा
१५	रिसोड	गोभणी
१६	रिसोड	कोयाळी बुरी
१७	रिसोड	हिवरा पेन
१८	रिसोड	किनखेडा
१९	रिसोड	केशवनगर

२०	रिसोड	बाळखेड
२१	रिसोड	मांगवाडी
२२	रिसोड	धोडप बु.
२३	रिसोड	वाकद
२४	रिसोड	कोयाळी (खु) री
२५	रिसोड	येवता
२६	रिसोड	लेहणी
२७	रिसोड	गणेशपुर
२८	रिसोड	लोणी खु.
२९	मालेगांव	बोर्डी
३०	मालेगांव	केली
३१	मालेगांव	वाडी रामराव
३२	मालेगांव	खेर्डा
३३	मालेगांव	देवठाणा खांब
३४	मालेगांव	आमखेडा
३५	मालेगांव	शिरसाळा
३६	मालेगांव	बोराळा जहॉ
३७	मालेगांव	खंडाला शिंदे
३८	मालेगांव	ढोरखेडा
३९	मालेगांव	कलंबेश्वर
४०	मालेगांव	नागरतास
४१	मालेगांव	दुधाळा

४२	मालेगांव	जउकाळा
४३	मगरुळपीर	लाठी
४४	मगरुळपीर	शिवणीरोड
४५	मगरुळपीर	जुनुना बु.
४६	मगरुळपीर	कंझरा
४७	मगरुळपीर	चांभई
४८	मगरुळपीर	जांब
४९	मगरुळपीर	हिसई
५०	मगरुळपीर	बिटोडा भो.
५१	मगरुळपीर	वरुड (ब.)
५२	मगरुळपीर	दस्तापुर
५३	मगरुळपीर	अरक
५४	मगरुळपीर	शिवणी द.
५५	मगरुळपीर	वसंतवाडी
५६	मगरुळपीर	पिंपळगांव
५७	मानोरा	अजणी
५८	मानोरा	दापुरा खु.
५९	मानोरा	उपरी बु.
६०	मानोरा	चौंडी
६१	मानोरा	बोरव्हा
६२	मानोरा	सोमनाथनगर
६३	मानोरा	देवठाणा

६४	मानोरा	जुनुना खु.
६५	मानोरा	रुद्राळा
६६	मानोरा	गोस्ता
६७	मानोरा	भोयणी
६८	मानोरा	कोलार
६९	मानोरा	चौसाळा
७०	मानोरा	कार्ली
७१	कारंजा	पसरणी
७२	कारंजा	म्हसला
७३	कारंजा	कोळी
७४	कारंजा	गिर्डा
७५	कारंजा	धनज बु.
७६	कारंजा	पिंपळगांव बु.
७७	कारंजा	सुकळी
७८	कारंजा	लाडेगांव
७९	कारंजा	पिंप्री वरघट
८०	कारंजा	तारखेडा
८१	कारंजा	तुळजापुर
८२	कारंजा	धोत्रा देशमुख
८३	कारंजा	निंबा जहाँगीर
८४	कारंजा	वापटी कुपटी
८५	कारंजा	शिवण (बु.)

प्रपत्र-"क"		
राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत उस्मानाबाद जिल्हयातील नवीन कार्यालयीन इमारत बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेलया ग्रामपंचायतींची यादी		
अ.क्र.	तालुका	ग्रामपंचायतींचे नांव
१	उमरगा	भगतवाडी (व्हीएसटीफ़)
२	उस्मानाबाद	दुधगांव(व्हीएसटीएफ़)
३	कळंब	डिकसळ
४	उस्मानाबाद	जागजी
५	उस्मानाबाद	केशेगाव
६	कलंब	मस्सा खं
७	उस्मानाबाद	आळणी
८	उमरगा	भूसणी
९	लोहारा	जेवळी द
१०	परंडा	सिरसाव
११	भूम	बाबी भ
१२	भूम	आष्टा
१३	उमरगा	बेडगा
१४	भूम	चिंचपूर ढगे
१५	उस्मानाबाद	येवती
१६	कळंब	भाटशिरपुरा
१७	परंडा	वाटेफ़ळ
१८	वाशी	गोजवाडा
१९	उस्मानाबाद	भंडारवाडी
२०	भूम	आरसोली
२१	कळंब	बाभळगांव
२२	उस्मानाबाद	सोनेगांव
२३	कळंब	बोरगांव ध

२४	कळंब	जायफ़ळ
२५	उस्मानाबाद	कामेगाव
२६	भूम	वरूड
२७	कळंब	सौंदणा आंबा
२८	वाशी	डोंगरेवाडी
२९	कळंब	गौरगाव
३०	परंडा	देवगाव खु
३१	कळंब	खोंदला
३२	कळंब	हिंगणगाव
३३	परंडा	भांडगाव
३४	उमरगा	कदमापूर
३५	वाशी	हातोला
३६	भूम	हिवरा
३७	भूम	जेजला
३८	परंडा	आलेश्वर
३९	कळंब	आढळा
४०	परंडा	खानापूर
४१	भूम	जयवंतनगर
४२	कळंब	सौंदाणा ढोकी
४३	वाशी	फ़ाक्राबाद
४४	भूम	नागेवाडी
४५	परंडा	मलकापूर/संजितपूर
४६	परंडा	अंदोरा/अंदोरी
४७	भूम	गोरमाळा
४८	कळंब	खेर्डा
४९	कळंब	आथर्डी

प्रपत्र-"ड"		
राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत गडचिरोली जिल्हयातील नवीन कार्यालयीन इमारत बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेलया ग्रामपंचायतींची यादी		
अ.क्र.	तालुका	ग्रामपंचायतींचे नांव
१	भामरागड	धिरंगी
२	भामरागड	होडरी
३	भामरागड	नेलगुंडा
४	एटापल्ली	दिंडवी
५	एटापल्ली	सोहगाव
६	एटापल्ली	कोहका
७	एटापल्ली	सेवारी
८	एटापल्ली	मानेवारा
९	एटापल्ली	मेंढरी
१०	एटापल्ली	वांगेतुरी
११	सिरोंचा	पातागुड्डम
१२	सिरोंचा	रमेशगुड्डम
१३	सिरोंचा	तुमनूर
१४	सिरोंचा	कोर्ला माल
१५	सिरोंचा	सोमनपल्ली
१६	सिरोंचा	लक्ष्मीदेवीपेठा
१७	सिरोंचा	चिंतरवेला
१८	कोरची	मोठाझेलीया
१९	कोरची	अल्लीटोला
२०	धानोरा	दराची
२१	धानोरा	देवसूर
२२	धानोरा	मुरगाव

२३	धानोरा	चिचोडा
२४	धानोरा	चातगाव
२५	धानोरा	चुडीयाल
२६	धानोरा	चिंगली
२७	धानोरा	नवरगाव
२८	अहेरी	महागांव बुज
२९	अहेरी	किष्ठापूर वेल
३०	अहेरी	वेडमपल्ली
३१	मुलचेरा	वेंगणुर
३२	कुरखेडा	रानवाही
३३	चामोर्शी	चौडमपल्ली
३४	देसाइगंज	शंकरपूर

****